| | |
|---|---|
| ***CNR NO.MHRT090003102012*** | **नियमित दिवाणी दावा क्रमांक ४६/२०१२ मध्ये नि. ९३ खालील आदेश** |

सदरचा अर्ज वादी यांनी दावा मिळकतीमध्ये चौथऱ्यावर बांधकाम करू नये व इतरांमार्फत करवू नये असा प्रतिवादी यांचे विरूध्द तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत व्हावा यासाठी दाखल केलेला आहे.

अर्जातील वादीचे कथनांचा सारांश पुढील प्रमाणे–

२. तालुका लांजा मधील गाव मौजे हर्चे येथील मिळकत भूमापन क्र. १०६७, क्षेत्र १७–१६–०० हेक्टर आर या मिळकती पैकी १५ हेक्टर ५६ आर क्षेत्र वाद विषयक मिळकत आहे. (इथून पुढे वाद मिळकत असे संबोधण्यात येत आहे.) प्रस्तुतचा दावा अर्जदाराने हक्क स्थापना, निरंतरची ताकीद याकरिता केलेला असून दावा अनिर्णयीत आहे. प्रतिवादीने आपली कैफियत देवून दावा नाकारलेला आहे. वाद विषयक मिळकतीमध्ये वादीची मालकी हक्काने वहीवाट आहे. वाद विषयक मिळकत समाविष्ट असलेला गट क्र. १०६७ चा छोटा भाग प्रतिवादी यांचे ताब्यात आहे. त्यात प्रतिवादीने दावा दाखल होणेपूर्वीच गडग्याने बंदीस्त तटबंदी केलेली आहे. त्या तटबंदीच्या बाहेर प्रतिवादीचा कसलाही हक्क संबंध नाही. एप्रिल २०२२ मध्ये वादी क्र. ०१ आजारी पडले व त्यावरील औषोधोपचाराकरिता ते पुणे येथे कुटूंबासह गेले असता. प्रतिवादीने मिळकतीत घुसण्याचा प्रयत्न करून खोटे पूरावे तयार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रतिवादीने दावा मिळकतीचे उत्तर–पूर्व दिशेस म्हणजेच वादी व प्रतिवादी यांच्या स्वतंत्र वहिवाटीच्या हद्दीच्या गडग्याच्या जवळ प्रतिवादीने वादीचे वहिवाटी क्षेत्रात दावा विषयक मिळकतीमध्ये विना परवाना बेकायदेशीर चौथरा बांधण्यास सुरवात केलेली आहे व त्यावर घराचे बांधकाम करण्यास घेतलेले आहे. सदरचे बांधकाम पूर्ण झाल्यास वादीचे न भरून निघणारे नुकसान करण्याच्या तयारीत प्रतिवादी आहेत. सदरचा दावा गुणदोषावर निकाली होण्यास वेळ आहे. सदरचे बांधकाम पूर्ण झाल्यास वादीचे न भरून निघणारे नुकसान होणारे आहे. सबब दावा मिळकतीमध्ये चौथऱ्यावर बांधकाम करू नये व इतरांमार्फत करवू नये असा प्रतिवादी यांचे विरूध्द तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश दाव्याचा अंतिम

निकाल लागेपर्यंत व्हावा अशी विनंती केली.

३. प्रतिवादी यांनी निशाण ९८ येथे आपले म्हणणे देवून सदर अर्जास तीव्र विरोध केला. प्रतिवादी यांचे कथनानुसार संपूर्ण मिळकत क्रमांक १०६७ प्रतिवादींच्या कब्जा व वहिवाटीस आहे. दावा विषयक मिळकतीचे विकास कार्य प्रतिवादी करीत आहेत. दावा मिळकतीशी वादी याचा कोणताही हक्क संबंध नाही. प्रतिवादीने आपले मालकी कब्जा वहिवाटीच्या गट क्र. १०६७ मध्ये घराचे बांधकाम पूर्ण केलेले आहे. सकृतदर्शनी वादीस केस नाही. सोयी गैरसोयीचा समतोल वादीचे बाजूने नसून प्रतिवादीचे बाजूने आहे. वादीचा अर्ज नामंजूर केल्यास वादीला कोणतेही नुकसान होणारे नसून अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादीचे न भरून निघणारे नुकसान होणार आहे. सबब अर्ज खर्चासहित नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली.

४. अर्जातील व म्हणण्यातील कथनांनुसार व मागणीनुसार पुढील वाद प्रश्न विचारार्थ उपस्थित होतात. सदर वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे आहेत.

| **वाद प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. प्रथम दर्शनी केस असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | नाही |
| २. सोयीची बाब वादीचे बाजूने आहे काय ? | नाही |
| ३. अर्ज नामंजूर झाल्यास अपरिमित नुकसान होणार असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | नाही |
| ४. आदेश काय ? | अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे. |

५. वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

## <u>का र ण मि मां सा</u>

## <u>वादप्रश्न क्रमांक १ ते ३ करीता</u>

६. सदर प्रकरणी दिवाणी प्रक्रिया संहिताचे क्रम ३९ नियम १ नुसार दाव्यात शपथ पत्रावरुन किंवा अन्यथा दाव्यातील वादग्रस्त मालमत्तेचा प्रतिवादी यांचेकडून अपव्यय केला जाण्याचा किंवा तीचे नुकसान केले जाण्याचा प्रयत्न अथवा करत असल्याचे सिध्द करण्यात आल्यास न्यायालयाला दावा निकालात निघेपर्यंत किंवा पुढील आदेश दिला जाईपर्यंत अशा विरोध कृतीला तात्पुरती मनाई देता येईल. सदर प्रकरणी वादी व प्रतिवादी यांनी त्यांची कथने ही शपथ पत्रावर केलेली आहेत. त्यामुळे अभिलेखावर असणाऱ्या कागदपत्रांचे अवलोकन सदर अर्जावर आदेश करतेवेळी करणे गरजेचे आहे.

७. वादी यांनी सदरच्या अर्जाद्वारे प्रतिवादी वाद विषयक मिळकतीमध्ये बांधकाम करीत आहेत व ते बांधकाम करू नये यासाठी तुर्तातुर्त ताकीदीची मागणी केलेली आहे. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल करून वाद मिळकतीमध्ये बांधकाम केल्याचे मान्य केलेले आहे. वादीच्या कथनानुसार मिळकत क्र. १०६७ चा मोठा भाग वादीचे ताब्यात आहे व छोटा भाग प्रतिवादी यांचे ताब्यात आहे. प्रतिवादी यांनी वादीच्या ताब्यात असणाऱ्या भागामध्ये बांधकाम करण्याचा प्रयत्न केलेला आहे असे वादीचे कथन आहे. सद्यस्थितीत वादीचे कथनानुसार मालकी व कब्जा वाद मिळकतीवर आहे किंवा कसे हे पहाणे गरजेचे आहे. निशाण ०७ येथे वादीच्या तुर्तातुर्त अर्जावर गुणदोषावर सविस्तर आदेश करून वादी दावा मिळकतीचे कब्जे वहिवाटीस असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नसल्याचे नमूद केलेले आहे. निशाण ०७ येथील अर्जातील कथनांचे व्यतिरीक्त नवीन कथनांचा आधार घेवून वादीने सदरचा अर्ज केला आहे किंवा कसे हे पाहणे गरजेचे आहे. सदरच्या अर्जात वादीने निशाण ०७ येथील अर्जातील कथनांन व्यतिरीक्त कोणत्याही नविन कथनांचा आधार घेतलेला दिसून येत नाही. निशाण ०७ येथील आदेशाचा सदरचा अर्ज निकाली करतेवेळी विचार करणे गरजेचे आहे. सबब वादी हा दावा विषयक मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस आहे असे सकृतदर्शनी दर्शविण्यासाठी वादीने कोणताही नवीन पुरावा अभिलेखावर दिलेला नाही.

८. वादी यांच्या कथनांनुसार प्रतिवादी हा दावा विषयक मिळकतीमध्ये

बांधकाम करू पाहत आहे परंतू प्रतिवादी यांनी त्यांचे निशाण १०६ सोबत दाखल कागदपत्रान्वये व छायाचित्रान्वये प्रतिवादी यांनी घराचे बांधकाम संपूर्ण बांधकाम केलेल्याचे दिसून येत आहे. दावा विषयक मिळकतीमधील प्रतिवादीने केलेले घराचे बांधकाम प्रतिवादीने मान्य केलेले आहे. अर्जातील मागणी ही बांधकाम करू नये किंवा करवू नये या संदर्भात होती. परंतू प्रतिवादीने सदरचे बांधकाम पूर्ण केलेल्याचे त्याचे कथनांमध्ये नमूद केलेले असून सदरचे बांधकाम पूर्ण झालेल्याचे वर नमूद कागदपत्रान्वये दिसून येत आहे. सद्यस्थितीत वादीने ज्या उद्देशाने सदरचा अर्ज न्यायालयात दाखल केला होता. तो उद्देश आज रोजी अस्तीत्वात राहीला नसल्याचे दिसून येत आहे म्हणजेच प्रतिवादी याने संपूर्ण बांधकाम पूर्ण केलेल्याचे दिसून येत आहे. यावरून वादीस प्रतिवादीने वाद मिळकतीमध्ये बांधकाम करु नये अथवा करवू नये अशी मागणी करण्याचे कोणतेही कारण शिल्लक राहिल्याचे दिसून येत नाही. सबब अर्जदाराची अर्जातील मागणी मंजूर करता येणार नाही असे दिसून येत आहे.

९. वादी याने प्रतिवादी बांधकाम करीत आहे हे मान्य केलेले आहे. प्रतिवादी यांनी त्याचे कथनात सदरचे बांधकाम हे घराचे असल्याचे कथन केलेले आहे. तसेच झालेले बांधकाम पुढे करू नये असे आदेश दिल्यास वादीपेक्षा प्रतिवादी यांचे पैशाचे स्वरूपात न भरून निघणारे नुकसान होणार आहे हे दिसून येत आहे. वरील कारणमिमांसेचा विचार करता वादीस सकृतदर्शनी केस असल्याचे वादी सिध्द करू शकलेला नाही. परिणामी सोयीची बाब वादीचे बाजूने दिसून येत नाही. सदरचा अर्ज दाखल करून दावा प्रलंबित ठेवल्याने सदर अर्जाचा खर्च वादीवर ठेवण्यात येत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे–

## <u>आ दे श</u>

वादी याचा निशाण ९३ येथील अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

PRATHAMESH RAMESH BHOSALE
Digitally signed by PRATHAMESH RAMESH BHOSALE
Date: 2023.08.28 10:43:43 +0530

**दिनांक २३/०८/२०२३** **(प्र.र.भोसले)**

**ठिकाण लांजा.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, लांजा,**

**ता.लांजा, जि.रत्नागिरी**

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| Judgment/Order in :- **Order on Exh. 93** in **R.C.S. 46/2012** | | |
| I affirm that the contents of this pdf file Judgment/ Order are same word as per original Judgment. | | |
| Name of Stenographer | :- | S. D. Chavan |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Lanja |
| Date of decision | :- | 23/08/2023 |
| Order Signed by P.O. on | :- | 23/08/2023 |
| Order uploaded on | :- | 28/08/2023 |